उद्याचा मराठवाडा

दि. 28/05/25

# चोरीतील तब्बल २६ दुचाकी जप्त

## भाग्यनगर पोलिसांची जम्बो कारवाई; पाच जणांना घेतले ताब्यात

नांदेड (प्रतिनिधी) - नांदेड शहर व जिल्ह्यातील विविध भागात दुचाकी चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडल्या होत्या. त्यामुळे दुचाकीचोरांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आदेशित केले होते. त्यानुसार भाग्यनगर पोलिसांनी जम्बो कारवाई करीत पाच जणांना ताब्यात घेत त्यांच्याकडून तब्बल २६ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. भाग्यनगर पोलिसांनी केलेल्या कारवाईत १८ लाख २० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या संकल्पनेतून ऑपरेशन फ्लशआऊट मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील विविध भागातून चोरीला जाणाऱ्या दुचाकी ही मोठी समस्या होती. एकाच चोरीच्या घटनेचा तपास सुरू होण्यापूर्वी दुचाकी चोरीच्या दुसऱ्या घटनेची नोंद पोलीस ठाण्यात होत होती. त्यामुळे दुचाकी चालक-मालकांमध्ये मोठे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत दुचाकी चोरट्यांचा बंदोबस्त करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिले होते. या आदेशानुसार भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सुचित करीत पेट्रोलिंगची गस्त वा

भाग्यनगर पोलिसांना पेट्रोलिंग दरम्यान गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दोन इसम कॅनॉल रोडवर थांबलेले असून त्यांच्याजवळ चोरीतील दुचाकी असल्याचे सांगितले. यानुसार पोनि शेंडगे यांच्या मार्गदर्शनात भाग्यनगर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन त्या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली असता, त्यांच्याकडे असलेली दुचाकी चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. माधव शंकरराव राजेगोरे रा. शेलगाव ता. अर्धापूर, संतोष सुधाकर वंगाले रा. तळेगाव ता. उमरी (मेकॅनिक) यांना ताब्यात घेऊन भाग्यनगर पोलिसांनी अधिकची विचारपूस केली असता, त्यांनी आपले साथीदार बालाजी शंकरराव राजेगोरे (वय २०, रा. शेलगाव ता. अर्धापूर), आत्माराम उर्फ भय्या बालाजी कदम (वय १९, रा. शेलगाव ता. अर्धापूर) आणि मंगेश संजय लोमटे (वय २०, रा. चुंचा ता. कळमनुरी जि. हिंगोली) अशा पाच जणांनी विविध भागातून २६ दुचाकी चोरी केल्याचे सांगितले.



> दुचाकी चोरी प्रकरणात भाग्यनगर पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेत तब्बल २६ दुचाकी ताब्यात घेतल्या आहेत. ज्यांनी चोरांकडून दुचाकी खरेदी केल्या आहेत, त्यांच्या विरोधातही आम्ही कारवाई करणार आहोत. जनतेला आमचे आवाहन आहे की, कोणीही चोरीच्या दुचाकी खरेदी करु नयेत.
>
> **- अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक, नांदेड

पाचही आरोपींना भाग्यनगर पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडील २६ दुचाकी ताब्यात घेतल्या, ज्यांची किंमत १८ लाख २० हजार रूपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांच्या अधिपत्याखाली भाग्यनगर गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक नरेश वाडेवाले, पोहेकॉ गजानन किडे, पोकॉ विशाल माळगे, पोकॉ पठाण यांच्या टिमने केली आहे. या कारवाईबद्दल पोलीस अधिक्षकांनी भाग्यनगर पोलिसांचे अभिनंदन केले आहे.